साप्ताहिक
# दर्शक

E-mail : weeklydarshak.gmail.com R.N.I.NO.MAH/MAR/2000/02266

वर्ष ३५ अंक ४७ सोमवार ६ जुलै ते रविवार १२ जुलै २०२० किंमत रु.२




# 'कोहिनूर वस्त्रदालन' जबाबदार चालक व मालकावर गुन्हा दाखल करण्याची 'आप'ची मागणी



अहमदनगर – शहरात करोनाचे संक्रमण कापड बाजार येथील कोहिनूर क्लॉथ स्टोअर येथून वाढले असून नियमांची पायमल्ली केल्याने करोना वाढीस कोहिनूर वस्त्रदालन कारणीभूत ठरल्याचा आरोप करीत आम आदमी पार्टीच्या वतीने कोहिनूरच्या चालक व मालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली. या मागणीचे निवेदन पोलीस अधीक्षक कार्यालयात देण्यात आले. यावेळी अ‍ॅड. जावेद काझी, रवी सातपुते,भरत खाकाळ, शकील शेख उपस्थित होते.निवेदनात म्हटले आहे की,मागील आठवड्यात अहमदनगर शहरातील मध्यवर्ती दाटवस्तीच्या तोफखाना भागात अचानक करोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले. हे संक्रमण दिवसेंदिवस वाढत असल्याने शहरात करोनाची दहशत निर्माण झाली आहे. अटी व शर्ती घालून प्रशासनाने शहरातील कापड दुकाने ठराविक काळ उघडण्यास परवानगी दिली होती. मात्र त्याचा गैरफायदा घेऊन कापड बाजारातील कोहिनूर क्लॉथ स्टोअर सुरू झाले. या वस्त्रदालनात शहरातील सुमारे दोनशे कर्मचारी कार्यरत आहेत. प्रशासनाने करोनाचा प्रादूर्भाव वाढू नये म्हणूनफिजीकल डिस्टन्स, सॅनिटायझर, स्वच्छता आदी नियमांची दक्षता घेण्याचे निर्देश दिले होते. कोहिनूरचे मालक व चालक यांनी एकाच वेळी चारशे ते पाचशे ग्राहकांना प्रवेश देऊन जोरात व्यापार सुरू केला. त्यामुळे दुकानात काम करणार्‍या कर्मचार्‍यांना करोनाची लागण झाली. शहरातील मध्यभाग हॉटस्पॉट झाल्याने त्याचा गंभीर परिणाम सामान्य जनतेवर पडू लागला आहे. याला कोहिनूरचा निष्काळजीपणा जबाबदार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# जिल्हा रुग्णालयात सुविधा तातडीने वाढवावी अन्यथा मनसेचे आंदोलन

**खासगी हॉस्पिटलचे बेड, व्हेंटिलेटर ताब्यात घ्या**

अहमदनगर । जिल्ह्यातील करोना आजारावरील आरोग्य व्यवस्था उपचार घेत असलेल्या २०० रुग्णांमध्ये पूर्णपणे कोलमडली असून काल, रविवारी सावेडी भागातील एक खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेली महिला करोना पॉझिटीव्ह रिपोर्ट आल्यानंतर तिला व्हेंटिलेटरची गरज भासू लागली. श्वास घेण्याचा त्रास जाणवत असल्यामुळे सदर महिलेला जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. परंतु तिथे तिला उपचारासाठी व्हेंटिलेटर उपलब्ध नसल्याचे तिच्या नातेवाईकांना सांगितले. पुन्हा त्या महिलेला सावेडी भागातील त्या खासगी हॉस्पिटलला घेऊन जावे लागले. परंतु खासगी हॉस्पिटमध्ये उपचाराकरिता कोणतीही उपकरणांची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे या महिलेला पुण्याच्या ससून रुग्णालयात उपचाराकरिता कार्डियाक अ‍ॅम्ब्युलन्सने १६ हजार रूपये खर्च करून हलविण्यात आले. या रुग्णाचे झालेले हाल पाहता याला जबाबदार आपली यंत्रणा असून शासन आदेश असताना देखील कुठल्याही खासगी हॉस्पिटलचे ८० टक्के बेड, व्हेंटिलेटर आपल्या प्रशासनाने ताब्यात घेतलेले नाहीत. अहमदनगर शहरातील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये फक्त १२ व्हेंटिलेटर असून ते दररोज नवीन ४० ते ५० पॉझिटीव्ह सापडलेल्या रुग्णांना पुरेसे नाहीत. हे सर्व व्हेंटिलेटर रुग्णांना लावण्यात आले असून आज जिल्हा रुग्णालयात व्हेंटिलेटर शिल्लक नाहीत. दररोज वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता आपण राज्य सरकारने दिलेल्या ओशासनानुसार खासगी हॉस्पिटलचे बेड, व्हेंटिलेटर ताब्यात घ्यावेत तसेच जिल्हा रुग्णालयात सुध्दा अशा प्रकारची सुविधा तातडीने वाढवावी अन्यथा मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, शहराध्यक्ष गजेंद्र राशीनकर , उपजिल्हाध्यक्ष मनोज राऊत, अ‍ॅड. अनिता दिघे यांच्या नेतृत्वाखाली मनसैनिक आंदोलन करतील, असा इशारा दिला आहे.

**परदेशी कामगारांशी संबंधित अप्रवासी कोटा विधेयकाला मंजूरी**

# ८ लाख कुवैती भारतीयांवर गडांतर

कुवेत (वृत्तसंस्था) – परदेशी कामगारांशी संबंधित अप्रवासी कोटा विधेयकाला मंजूरी देण्यात आल्यामुळे नोकरी व व्यवसायासाठी येथे राहात असलेल्या जवळपास ८ लाख भारतीयांवर गडांतर आले आहे.कुवेत संसदेने या विधेयकाला मंजूरी दिली आहे. आता सरकारने याची त्वरीत अंमलबजावणी केली तर भारतीयांचे व्हिसा निलंबीत केले जातील व त्यांना देशही सोडावा लागण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कुवेतमध्ये लाखोंच्या संख्येने परदेशी नागरिक आहेत, त्यात भारतीयांची संख्या सर्वात जास्त आहे. मुळ कुवेतची लोकसंख्या जवळपास ४५ लाख असून त्यात भारतीयांची संख्या ७ लाखांच्या आसपास आहे. देशातील मुळ नागरिकच अल्पसंख्यांक होण्याची भीती देशातील नेत्यांनी व्यक्त करत हे विधेयक संसदेत सादर करण्यासाठी सरकारवर दबाव आणला होता. परदेशी कामगारांवर यापुढे अवलंबून राहू नये अन्यथा देशातील कामगारांवर उपासमारीची वेळ येइल असे व्यक्त करताना संसदेने हे विधेयक मंजूर केले. या विधेयकातील तरतुदींनूसार परदेशी कामगारांची संख्या १५ टक्के असावी असे स्पष्ट करण्यात आले असून आता हे विधेयक देशाच्या घटना समितीकडे पाठविण्यात येणार आहे. त्याला या समितीने मंजूरी दिल्यानंतरच त्याचा अंतिम आराखडा तयार केला जाणार आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी भारतीयांची संख्या जवळपास १४ ते १५ लाख असून त्यातील निम्म्यापेक्षाही जास्त भारतीयांना देश सोडावा लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# गलवानमधून चीनची माघारीस सुरुवात

नवीदिल्ली । वृत्तसंस्था – पूर्व लडाखमधील गलवान खोर्‍यात तणाव कमी करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. कॉर्प्स कमांडरच्या बैठकीत ज्या ठिकाणाहून सैन्य मागे घेण्याचे निश्चित झाले होते, तिथून चीनची सैन्य वाहने, तंबू आणि सैनिक एक ते दोन किलोमीटरपर्यंत मागे हटले आहेत. या सर्व परिस्थितीवर भारतीय सैन्याचे अत्यंत बारीक लक्ष आहे.संपूर्ण पूर्व लडाखमध्ये एप्रिलच्या मध्यापर्यंत जी स्थिती होती, तीच स्थिती कायम करण्याची भारताची मागणी आहे. यापूर्वी कॉर्प्स कमांडरच्या बैठकीत जे ठरले होते, तो शब्द चीनने फिरवला होता. त्यामुळे १५ जूनच्या रात्री गलवान खोर्‍यात पेट्रोलिंग पॉईंट १४ जवळ रक्तरंजित संघर्ष झाला होता. ज्यामध्ये २० भारतीय जवान शहीद झाले होते तर चीनचे ४० पेक्षा जास्त सैनिक ठार झाले होते. चीनने गलवानमध्येच नव्हे तर हॉटस्प्रिंग, पँगाँग टीएसओ भागातही घुसखोरी केली आहे. इथे फिंगर फोरपर्यंत चिनी सैन्य आहे. हा संघर्षाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. एप्रिलच्या मध्यापर्यंत भारतीय सैन्य फिंगर आठपर्यंत गस्त घालायचे.त्यामुळे चिनी सैन्याने फिंगर आठपर्यंत माघारी फिरावे ही भारताची मुख्य मागणी आहे. चीनच्या दबावाच्या खेळीसमोर न झुकता भारताने चीनला लागून असलेल्या ३,४८८ किलोमीटरच्या सीमारेषेवर सैन्य तैनाती केली आहे.

# शेतकर्‍यांना २४ तास वीज उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील : ना.तनपुरे

अहमदनगर– राज्य सरकार शेतकर्‍यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असून,त्यांना मुबलक व माफक दरात वीजपुरवठा कसा करता येईल,यासाठी प्रयत्नशील आहे.मुख्यमंत्री कृषी सौर योजनेच्या माध्यमातून शेतकर्‍यांना २४ तास वीज उपलब्ध करून देण्यासाठीचे कामकाज हाती घेण्यात आले आहे. लवकरच शेतकर्‍यांना त्याचा लाभ मिळेल. तसेच नवनवीन तंत्रज्ञानाचा व एकात्मिक शेती पद्धतीचा अवलंब करून शेतकरी व विशेषतः तरुण शेतकर्‍यांनी शेती करायला हवी, असे प्रतिपादन राज्यमंत्री प्राजक्ततनपुरे यांनी केले. जेऊर व परिसरातील वाड्यावस्त्यांवर कृषी विभाग व महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवार फेरीचे आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ना. तनपुरे यांनी थेट शेतकर्‍यांच्या बांधावर जाऊन त्यांच्याशी संवाद साधत अडचणी समजून घेतल्या. यावेळीते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवाजीजगताप, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, जि. प. सदस्य गोविंद मोकाटे, उपविभागीय कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब नितनवरे, मंडळ कृषी अधिकारी सूर्यकांत शेकडे, संजय मेहेत्रे, संजय मेचकर, बहिरवाडीचे सरपंच विलास काळे, राजू दारकुंडे, संजय आवारे, दत्तात्रय आवारे, दत्ता म्हस्के, डॉ. अजय मगर, दिगंबर मगर, बाळासाहेब मगर, संजय ससे, रामदास ससे,दत्तात्रय म्हस्के, बाळासाहेब मोकाटे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. तनपुरे पुढे म्हणाले की, कृषी विभाग व महात्मा फुले कृषी विद्यापीठ हातात हात घालून काम करीत असल्याने शेतकर्‍यांना त्याचा निश्चितच फायदा होईल.त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल.या माध्यमातून शेतकर्‍यांच्या बांधापर्यंत नवनवीन तंत्रज्ञान पोहोचण्यास मदत होईल, असे ते म्हणाले.डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठाच्या विविध योजनांची माहिती देऊन एकात्मिक शेती पद्धतीचा अवलंब कसा करावा,यावर सखोल मार्गदर्शन केले. कृषी अधीक्षक जगताप यांनीपीक व्यवस्थापन व कीड व्यवस्थापनाबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब नितनवरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

# डॉ. बोरगे व गंधेंचे जामीन न्यायालयाने फेटाळले!

अहमदनगर : मनपाच्या कार्यरत नर्सच्या अल्पवयीन मुलाला मारहाण करणारे मनपा वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल बोरगे व महिलांचा बेकायदा गर्भपात करणारे नगर तालुक्यातील जखणगाव येथील डॉ. सुनील गंधे या दोन्ही डॉक्टरांचे जामीन अर्ज अहमदनगर न्यायालयाने फेटाळून लावले आहेत. आता उच्च न्यायालयात अपील करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय या डॉक्टरांकडे राहिला नाही. महापालिकेतील महिला कर्मचाऱ्याच्या घरात जाऊन पार्टी करत अल्पवयीन मुलाला मारहाण केल्याच्या आरोपावरून दाखल गुन्ह्यात महापालिकेचा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे याने दाखल केलेला अंतरिम अटकपूर्व जामीन अर्ज आज जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळला.महापालिकेतील महिला कर्मचाऱ्याच्या घरात जाऊन पार्टी करत अल्पवयीन मुलाला मारहाण केल्याच्या आरोपावरून दाखल गुन्ह्यात महापालिकेचा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे याने दाखल केलेला अंतरिम अटकपूर्व जामीन अर्ज आज जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळला. डॉ. बोरगेसह आपत्ती व्यवस्थापन विभागप्रमुख शंकर मिसाळ व दोन कर्मचाऱ्यांच्या विरोधात मारहाण झालेल्या अल्पवयीन मुलाच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल होताच हे दोन्ही अधिकारी पसार झाले आहेत. या अल्पवयीन मुलाने आरोपीकडून जिवाला धोका असल्याचे सांगत त्यांना अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर करू नये, असे न्यायालयात सांगितले होते. दोन दिवसांपूर्वी मुलाला चार अज्ञात व्यक्तींनी मारहाण करत गुन्हा मागे घेण्यासाठी धमकावले होते. फिर्यादीतर्फे ॲड. महेश शेडाळे यांनी बाजू मांडली. त्यांना ॲड. अरुण बनकर यांनी साह्य केले. डॉ. बोरगे महापालिकेचे जबाबदार अधिकारी असूनही गुन्हे करतात. त्याच्या बेजबाबदार वागणुकीमुळे यापूर्वीही खातेनिहाय चौकशा सुरू आहेत. त्यास एकदा निलंबितही करण्यात आले होते, असे ॲड. शेडाळे यांनी न्यायालयात सांगितले. त्यानुसार न्यायालयाने डॉ. बोरगेचा अंतरिम अटकपूर्व जामीन फेटाळून लावला.

## सरावाबाबत बीसीसीआय अद्याप संभ्रमात

मंथबई – भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय)भारतीय क्रिकेटपटूंसाठी सराव शिबिराचे आयोजन करणार असल्याचे जाहीर केले असले तरीही याबाबत सरकार परवानगी देणार का असा प्रश्न पडलेला असल्याने अद्याप संभ्रम कायम राहिला आहे.देशात करोनाचा धोका वाढल्याने मार्च महिन्यातील दक्षिण आफ्रिकेविरुद्धची मालिका रद्द करण्यात आली. त्यानंतर आयपीएल स्पर्धा अनिश्‍चित कालावधीसाठी स्थगित करण्यात आली. आता देशात लॉकडाऊन असताना तसेच करोनाचा धोकाही कायम असताना केंद्र सरकारने काही सवलती दिल्या आहेत.देशातील मैदाने व क्रीडा संकुले खुली करण्यात आली असली तरी क्रिके टपटूंचे सराव सांघिकपणे सुरु करण्यात आलेले नाहीत. त्र्यांतील काही खेळाडू वैयक्तिक पातळीवर सराव करत असले तरीही अद्याप सांघिक सरावाला केंद्र सरकारने परवानगी दिलेली नाही. यचबाबत बीसीसीआयसह मुंबई क्रिकेट संघटनेने देखील पत्र व्यवहार केले आहेत. मात्र, अद्याप त्याबाबतसरकारकडून काहीही स्पष्ट करण्यात आलेले नाही. भारतीय संघाचे तसेच देशांतर्गत स्पर्धांमध्ये खेळत असलेल्या क्रिकेटपटूंचे सराव शिबिर येत्या ऑगस्टमध्ये सुरु करण्यात येणार असे जाहीर केलेल्या बीसीसीआयने आता एकपाऊल मागे घेतले आहे. अध्यक्ष सौरव गांगुली यांनीही याबाबत कानावर हात ठेवले असून सराव कधी सुरू होणार हे ठरलेले नाही, असे सांगत माध्यमांची बोळवण केली.

# ब्रिटनसह अकरा देशांची व्हिसा प्रक्रिया घरपोच

नवी दिल्ली,(वृत्तसंस्था)– करोनामुळे तसेच त्याबाबतच्या नियमांमुळे आता येत्या काळात ब्रिटनसह एकूण ११ देशांची व्हिसा प्रक्रिया घरातूनच करता येणार आहे. तसेच या व्हिसांची सेवा घरपोच देखील मिळणार आहे. एकूण ५१ देशांच्या व्हिसांची कागदपत्रांची प्रक्रिया व्हिएफएस ग्लोबल या संस्थेकडून आऊटसोर्स स्वरुपात घेण्याला परवानगी देण्यात आली आहे. यातील ब्रिटन व आयर्लंड या दोन देशांसह ११ देशांची व्हिसा प्रक्रिया मुंबई व पुणे या दोन शहरांतूनही करता येणार आहे.ही कार्यालये सोमवारपासून सुरु होणार आहेत. बाकी देशांची कार्यालये राजधानी दिल्लीतच सुरू राहणार आहेत.ही प्रक्रिया केवळ कागदपत्रांबाबत असून व्हिसा देणे तसेच त्याची मंजूरी देणे हे काम पूर्वीप्रमाणे दुतावासातूनच होणार आहे.बेलारूस, डेन्मार्क, डोमिनिक रिपब्लिक, आयर्लंड, इटली, नॉर्वे, पोर्तुगाल, दक्षिण कोरिया, तुर्की,युएई आणि ब्रिटन या देशांची व्हिसा प्रक्रिया सोमवारपासून सुरू होणार आहे. अमिरातीसाठीची प्रक्रीया यापूर्वीच सुरू करण्यात आली आहे.याबाबतची सर्व माहिती या देशांच्या अधिकृत संकेतस्थळांवर मिळेल, असे या संस्थेने स्पष्ट केले आहे. करोनाचा धोका अद्याप कायम असल्याचे हा निर्णय घेण्यात आला आहे. सोशल डिस्टन्सिगचे पालन, आनावश्यक होणारी गर्दी,वाहतूकींवर असलेली बंधने खासगी वाहनातून करण्यात येत असलेल्या प्रवासावरील निर्बंध यांमुळे ही सेवा सुरू करण्यात आली आहे.

**जे कोणी औषध सापडल्याचा दावा करत असतील तर त्यांच्याकडे पुरावे मागितले पाहिजेत**

# करोनावरची लस मिळण्यासाठी वेळ लागेल

जिनिव्हा,(वृत्तसंस्था) – करोनाने जगभरात हाहाकार केला असून त्यावर उपयुक्त लस शोधण्याचे काम अनेक देशांत सुरू झालेले असले तरीही ही लस प्रत्यक्षात उपलब्ध होण्यासाठी किमान २ ते अडीच वर्षे लागतील, असे मत जागतिक आरोग्य संघटनेने व्यक्त केले आहे.चीनमधून हा करोना विषाणू जगभरात पोहोचला व त्यामुळे लाखो लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. यावर रामबाण ठरेल अशी लस अद्याप शोधण्यात आलेली नाही. अनेक देशांचे याकामी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, यासाठी बराच काळ वाट पाहावी लागणार आहे. तसेच केवळ ही लस मिळून उपयोग नाही तर त्याचे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.ही लस शोधली गेली तरी त्याचे वाटप व विक्री श्रीमंत व गरीब देशांना समान पद्धतीनेच झाले पाहिजे. सद्यस्थितीत



अनेक संशोधकांनी विविध प्रकारचे औषध करोनावर उपयुक्त ठरेल, असे दावे केले असले तरीही त्याची मानवावर प्रत्यक्ष चाचणी करण्यात आली का याबाबत संभ्रम आहे. तसेच जर अशी चाचणी झाली असेल तर त्याचे निकाल काय लागले तसेच त्याचा परिणाम सकारात्मक दिसून आला का याबाबत अद्याप कोणत्याच देशाने काहीही स्पष्ट केलेले नाही. अशा स्थितीत करोनावर उपाय सापडला असे म्हणता येणार नाही,असेही संघटनेच्या सूत्रांनी सांगितले आहे.अनेक देशांमध्ये मानवावर चाचणी सुरू असल्याचे वृत्तही अनेकदा वाचनात येत आहे.मात्र, त्याचे परिणाम काय झाले ते अद्याप स्पष्ट झालेले नाही.एकदा करोनातून मुक्त झाला तरीही त्या व्यक्तीला पुन्हा बाधा होणार नाही हे देखील सध्या कोणीही ठामपणे सांगू शकत नाही.त्यामुळे जे कोणी औषध सापडल्याचा दावा करत असतील तर त्यांच्याकडे पुरावे मागितले पाहिजेत. अशी औषधे जर शोधण्यात यश आले तर त्याचा प्रयोग केल्यावर रुग्ण पूर्ण तंदुरुस्त ठरला का हे देखील पाहिले गेले पाहिजे. औषध सापडणे यापासून अनेक गोष्टी अद्याप सिद्ध झालेल्या नाहीत, त्यामुळे विनाकरण करोनावरचे औषध सापडले असे समजू नये, असेही मत संघटनेने व्यक्त केले आहे.

# शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यापेक्षा तांबेंनी जिल्हयात गटबाजीला प्रोत्साहन दिले

अहमदनगर : जिल्हा प्राथमिक शिक्षक संघांच्या प्रभारी अध्यक्षपदी बापू तांबे यांची आठ महिन्यांपूर्वी राज्य संघाने निवड केली होती परंतू गेल्या आठ महिन्यांपासून जिल्ह्यामध्ये संघटनात्मक कामकाज पूर्णपणे बंद असून शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यापेक्षा तांबे यांनी जिल्हयात गटबाजीला प्रोत्साहन देऊन राज्य संघाच्या व जिल्हा संघाच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता मनमानी प्रकारे शिक्षक बँकेत कारभार केलेला असून भ्रष्टाचाराच्या अनेक प्रकरणांमुळे संघाची नाहक बदनामी होत आहे. त्यामुळे राज्य संघाचे नेते संभाजीराव थोरात व राज्याध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांचे आदेशाने तांबे यांची हकालपट्टी करून त्यांच्या जागी प्रवीण ठुबे यांची निवड करण्यात आल्याची माहिती नाशिक विभागीय अध्यक्ष आबासाहेब जगताप यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. या पत्रात म्हंटले आहे की,संघ वाढविण्यासाठी ज्या जेष्ठ पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यात योगदान दिले त्या सर्व पदाधिकाऱ्यांना अंधारात ठेवून शिक्षक बँकेचा कारभार केला जात असून जिल्ह्यातील सर्व शिक्षकांच्या भावना याबाबत अतिशय तीव्र आहेत.तांबे यांनी प्रभारी अध्यक्ष म्हणून तालुका संघाच्या केलेल्या निवडींचा जिल्हाध्यक्ष म्हणून फेरआढावा घेऊन आबासाहेब जगताप ,संघाचे माजी जिल्हाध्यक्ष संजय शेळके,केंद्रप्रमुख संघाचे सरचिटणीस निळकंठ घायतडक, राज्य उपाध्यक्ष कैलास चिंधे यांचे मार्गदर्शनाखाली जिल्ह्याचे अधिवेशन घेऊन उर्वरीत कार्यकारणी जिल्हाध्यक्ष प्रविण ठुबे यांनी जाहीर करावी असे राज्य संघाचे नेते संभाजीराव थोरात व राज्याध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांनी प्रविण ठुबे यांना दिलेल्या निवड पत्रात म्हटले आहे.या निवडीमुळे जिल्ह्यात शिक्षक संघात आलेला विस्कळीतपणा दूर होऊन शिक्षक संघ मजबूत होईल.या निवडीबद्दल जिल्हाभरातून प्रविण ठुबे यांचे जिल्हाभरातून स्वागत होत आहे,असे जगताप यांनी सोशल मीडियावर व्हायरल केलेल्या या पत्रात म्हटले आहे.दरम्यान, हा तांबे यांच्या हकालपट्टीचा निर्णय त्यांच्या समर्थकांना रुचलेला नाही. तांबे यांच्या आदेशाने त्यांच्या समर्थकांनी याविषयावर कोणत्याही प्रतिक्रिया देण्याचे टाळले असले तरी तांबे यांच्या समर्थनाचा प्रत्येक तालुक्यातून ठराव घेवून तो राज्य शिक्षक संघ अर्थात संघाचे सर्वेसर्वा संभाजी थोरात यांना पाठविण्यास सुरूवात झाली आहे. या नाट्यमय घडामोडीने शिक्षक बँकेच्या वर्तुळात वेगळाच रंग भरला आहे.




# भारतीय कंपन्यांचा परदेशातही डंका

नवी दिल्ली,– भारती एअरटेलची पालक कंपनी असलेल्या भारती एंटरप्राइजेस कंपनीने ब्रिटनमधील उपग्रह कंपनी वन वेबचा ताबा मिळविला आहे. याबाबत बोललेल्या बोलीत भारती एंटरप्राइजेसची बोली सर्वात सुयोग्य ठरली.वन वेब आर्थिक अडचणीत होती. आता भारती एंटरप्राइजेसने ५०० दशलक्ष डॉलरची बोली बोलून ही कंपनी मिळविली आहे.विशेष म्हणजे यामध्ये ब्रिटन सरकारही सहभागी असून ब्रिटिश सरकार यामध्ये ५०० दशलक्ष डॉलरची गुंतवणूक करणार आहे. यामुळे भारती एंटरप्राइजेस जागतिक पातळीवर वायरलेस ब्रॉडबँड सुविधा उपलब्ध करू शकेल.त्याचा भारताबरोबरच जागतिक पातळीवर विमान वाहतूक, ग्रामीण भागातील नागरिक, जहाज वाहतूक इत्यादी क्षेत्रांना लाभ होईल, असे भारती एंटरप्राइजेसचे अध्यक्ष सुनील मित्तल यांनी हा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर म्हटले आहे. या व्यवहारामुळे भारतीय एंटरप्राइजेसच्या सहाय्याने ब्रिटिश सरकारही अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत झाले आहे, असे ब्रिटिश सरकारने म्हटले आहे.यामुळे कंपनीच्या भागधारकांच्या शेअर्स मध्येही उच्चांकी येईल आणि त्यांचाही भरघोस आणि परिपूर्ण असा लाभ आणि मोठा फायदा होईल असे मित्तल यांनी हा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर आनंद व्यक्त करताना सांगितले.

# प्रसारमाध्यमे दहशत दबावतंत्राचा संघटीतपणे मुकाबला करतील : मेहता

अहमदनगर : औरंगाबादच्या अधिकाऱ्यांनी दिव्य मराठी विरोधात दाखल केलेले गुन्हे हा माध्यमांवर दहशत निर्माण करण्याचाच प्रकार असून हा आताताईपणा असल्याच्या शब्दात सुधीर मेहता यांनी अधिकाऱ्यांचा निषेध केला. माध्यमे या दबावतंत्राचा बॅनरचा विचार न करता एकजुटीने आणि संघटीतपणे मुकाबला



करतील.मुख्यमंत्र्यांनी तातडीने हे गुन्हे रद्द करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करतानाच या अधिकारी आणि प्रशासनाला हा उद्दामपणा महागात पडेल,अशा शब्दात राष्ट्रीय पत्रकार महासंघ नवी दिल्लीचे महासचिव सुधीर मेहता यांनी या अधिकाऱ्यांना इशारा दिला आहे.उच्च न्यायालयाने ताशेरे ओढलेल्या अधिकाऱ्यांचा अहंकार आणि संयमाचा अभाव याबाबत फटकारल्यानंतर खरे तर प्रशासन आम्ही कसे काम करतोय वगैरे सांगु शकले असते. ‘सर्वांना विश्वासात घेउन कोरोनाशी लढतोय’ म्हणाले असते तरी आमच्या माध्यमांनी त्यांचे खुलासे छापले असते.अगदी नेहमीप्रमाणे सोइस्करपणे मुग गिळून गप्प बसले असते तरी चालले असतेच.धाडस या अधिकाऱ्यांमध्ये आले कुठुन असा सवाल करुन या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी राष्ट्रीय पत्रकार महासंघाने केली आहे.आपण यासंदर्भात गृहमंत्री अनिल देशमुख आणि महसुल मंत्री बाळासाहेब थोरात यांनाच कारवाईसाठी साकडे घालणार असल्याचे सुधीर मेहता यांनी सांगितले. प्रसार माध्यमे अतिशय जबाबदारीने कोरोना संकटात सरकारला साथ देत आहेत.काहीनी तर आपत्ती व्यवस्थापन कायदा म्हणजे सामान्य जनतेच्या अडवणुकीसाठी इष्टापत्तीच मानली.आणि याच अहंकारावर जनतेच्याच भावना मांडल्या उच्च न्यायालयाने ताशेरे ओढले असतानाही अधिकारी माध्यमांविरुध्द आतताई टोकाची भुमिका घेत असतील तर सरकारला एका वेगळ्या संघर्षाला सामोरे जावे लागेल, असा इशारा सुधीर मेहता यानी दिला. राष्ट्रीय पत्रकार महासंघ महाराष्ट्र शाखा यासंदर्भात खोटे गुन्हे दाखल करणार्या अधिकार्यांवर कारवाईसाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करेल, असे प्रदेशाध्यक्ष या नात्याने सुधीर मेहता यांनी सांगितले. राष्ट्रीय पत्रकार महासंघ नवी दिल्लीच्या राष्ट्रीय अध्यक्षा रुणू हजारिका आनि चेअरमन सुरेश कदम देशभरातून प्रसारमाध्यमे ज्या अडचणींचा सामना करत आहेत याकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधणार आहेत. असे सुधीर मेहता यांनी स्पष्ट केले.

साप्ताहिक दर्शक

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशन,संस्थापक संपादक शेख रियाजोद्दीन फजलोद्दीन यांनी दर्शकभवन,७२६,सरोष प्रिंटर्स,दिपाली थिएटर समोर,झेंडीगेट रोड,अहमदनगर ४१४००१ महाराष्ट्र येथे मुद्रीत करून येथेच प्रकाशित केले.बातम्यांची जबाबदारी कार्य.संपादक शेख आदिल रियाजोद्दीन यांच्यावर राहील मो.९७६३०३०३८६, ७६६६६०२६६० (अहमदनगर न्यायकक्षेत)

# टिकटॉक चिनी कंपनीला तब्बल ६ अब्ज डॉलरचा फटका

बीजिंग,(वृत्तसंस्था) - भारत सरकारने टिकटॉकसह ५९ चिनी ॲपवर बंदी घातल्यानंतर टिकटॉक या ॲपची पालक असलेल्या 'बाईट डान्स' या मूळ चिनी कंपनीला तब्बल ६ अब्ज डॉलरचा फटका बसण्याची शक्यता आहे गेल्या महिन्यात लडाखमध्ये सीमेवर भारतीय जवान आणि चिनी सैनिकांमध्ये झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर चिनी ॲपवर बंदी घालण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्या निर्णयाचा मोठा आर्थिक फटका 'बाईट डान्स'ला बसण्याची शक्यता असल्याचे वृत्त एका इंग्रजी वर्तमानपत्राने दिले आहे. 'बाईट डान्स' गेल्या काही वर्षात या कंपनीने भारतीय बाजारपेठेमध्ये १ अब्ज डॉलरची गुंतवणूक केली होती. मात्र, भारत सरकारच्या निर्णयामुळे या कंपनीला भारतातील व्यवसायच थांबवावा लागणार आहे. पर्यायाने कंपनीला ६ अब्ज डॉलरचा फटका सहन करावा लागणार आहे. अन्य संबंधित ॲपच्या व्यवसायावर अवलंबून असलेला तोटाही या ६ अब्ज डॉलरच्या नुकसानीमध्ये गृहित धरलेला आहे. 'टिकटॉक' हे शॉर्ट व्हिडीओ शेअरींगचे ॲप 'बाईट डान्स'च्याच बॅनरखाली तयार करण्यात आलेले होते. याबरोबर 'हेलो' हे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ॲपदेखील 'बाईट डान्स'ने तयार केले आहे. याशिवाय 'व्हिगो व्हिडीओ' हेदेखील व्हिडीओ शेअरींग ॲप 'बाईट डान्स'चेच उत्पादन आहे. मोबाइल ॲप ॲनालिसीस कंपनी 'सेन्सर टूवर'च्या डाटानुसार मे महिन्यात ११२ दशलक्ष लोकांनी 'टिकटॉक' डाऊनलोड केले आहे. भारतातील मोबाइल धारकांच्या २० टक्के जणांचा यामध्ये समावेश आहे. ही संख्या अमेरिकेतील मोबाइल धारकांच्या दुप्पट आहे.भारतीय ॲपना यामुळे सुगीचे दिवस आले असल्याचे दिसत आहे.

# जिल्हा बँकेमार्फत शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंतचे पिक कर्ज शुन्य टक्के व्याजदराने उपलब्ध होणार

अहमदनगर- जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जिल्हा सहकारी बँकेमार्फत मोठ्या प्रमाणावर पिक कर्ज वाटप होत असुन बँकेमार्फत देण्यात येणाऱ्या पिक कर्जासाठी रूपये १ लाखापर्यंत पिक कर्जासाठी रूपये ० टक्के तररूपये १ लाखाचे पुढे ते रूपये ३ लाखापर्यंतच्या पिक कर्जासाठी शेतकऱ्यांना २ टक्के व्याज भरावे लागत होते. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या व्याज परताव्यामुळे हे व्याज लागत होते. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्जदार शेतकरी सभासदांना १ लाखापुढे ते ३ लाखा पर्यंतच्या पिक कर्जासाठी शेतकरी सभासदांना २ टक्के भरावयाचे व्याज अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बँकेच्या स्वनिधीतुन भरणार असल्याचा निर्णय बँकेच्या संचालक मंडळाने घेतला असल्याची माहीती बँकेचे चेअरमन सिताराम पाटील गायकर, व्हाईस चेअरमन रामदास वाघ,ज्येष्ठ संचालक व माजी मंत्री शिवाजीराव कर्डीले व मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे यांनी दिली. बँकेच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जिल्हा बँकेमार्फत दिल्या जाणाऱ्या ३ लाखाच्या पिक कर्जासाठी टक्के व्याजदर लागणार असल्याने अडचणीत असणाऱ्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार असल्याची माहिती चेअरमन सिताराम पाटील गायकर यांनी देवुन पुढे सांगितले की, बँकेच्या याच निर्णयाबरोबर भोगवटादार नं.२ जमीन धारणा प्रकरणातील अनेक शेतकरी सभासद असल्याने व त्यांनी वारंवार पिक कर्जाची मागणी बँकेकडे केली आहे. मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे बँक या शेतकरी सभासदांना कर्ज पुरवठा करू शकत नव्हती. चालु वर्षी पाऊस चांगला आहे. परंतु कोविड-१९ च्या संकटामुळे शेतकरी वर्ग अडचणीत आला असल्याने अशा जिल्ह्यातील भोगवटादार नं.२ जमीन धारणा प्रकरणातील सभासदांनाही कर्ज पुरवठा करण्याचा निर्णय जिल्हा सहकारी बँकेने घेतला असल्याची माहिती चेअरमन सिताराम पाटील गायकर यांनी दिली. भोगवटादार नं.२ जमीन धारणा प्रकरणातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात बँक शासनाकडे पाठपुरावा करीत असुन शासनाकडून सकारात्मक निर्णय होणार असल्याचेही चेअरमन सिताराम पाटील गायकर यांनी मत व्यक्त केले.बँकेने चालु खरीप हंगामात १ लाख ७० हजार शेतकरी सभासदांना १००१ कोटीचे पिक कर्ज वाटप केले असुन बँकेस खरीप हंगामासाठी १४९८ कोटीचे व रब्बी हंगामासाठी ८०९ कोटीचे असे एकूण २३०७ कोटीचे पिक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिलेले असुन हे उद्दीष्ट बँक वेळेत पुर्ण करणार असल्याची माहिती देवुन बँकेचे चेअरमन सिताराम पाटील गायकर म्हणाले की, बँकेने नेहमीच जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे हिताचे निर्णय घेतलेले असुन बँकेने नुकतेच संयुक्त उतारा असलेले शेतकरी सभासद, पिक कर्ज सोडून मध्यम व दीर्घ मुदतीचे इतर बँकेकडून कर्ज घेणारे कर्जदार शेतकरी सभासद, महात्मा फुले कर्जुक्ती योजनेअंतर्गत पात्र असलेल्या मात्र शासनाकडून कर्जाफीची रक्कम प्राप्त न झालेल्या शेतकरी सभासदांसाठी पिक कर्ज पुरवठा करण्याचा निर्णय यापुर्वीचा जिल्हा बँकेने घेतलेला असल्याने बँकेमार्फत त्यांना शक्य होऊल तितके सहकार्य आणि शेतकऱ्यांना कोणताही असा त्रास होणार नाही याची काळजी घेत मोठ्या प्रमाणात पिक कर्ज वाटप होत असल्याची माहितीही श्री.गायकर यांनी दिली.

# कामगारांना वैद्यकीय उपचार सुविधा मिळणार

अहमदनगर- जिल्ह्यातील छोट्या- मोठ्या कंपन्यांतील २५ हजारावर कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मिळून तब्बल सुरे एक लाखावर कर्मचारी यांना राज्य बिमा निगमद्वारे (एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशन-इएसआयसी) वैद्यकीय उपचार सुविधा मिळणार आहेत. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अग्रिकल्चर तसेच याअंतर्गत काम करणाऱ्या एच.आर. फोरमने यासंदर्भात केलेल्या प्रयत्नांना यश आले असून, नगर जिल्ह्यामध्ये राज्य कर्मचारी विमा निगम (ई.एस.आय.सी.) कार्यालय आणि डिस्पेन्सरी स्थापन करण्यासाठी सरकारची परवानगी मिळाली आहे. मासिक २१ हजार वा त्यापेक्षा कमी वेतन असलेल्या कामगार-कर्मचाऱ्यांना कर्मचारी विमा निगमद्वारे सुविधा उपलब्ध करवून दिल्या जातात. कर्मचाऱ्याला जेवढा पगार आहे, त्याच्या एक टक्का रक्कम त्याने व तीन टक्के रक्कम त्याच्या कंपनी मालकाने एकत्र करून ही ४ टक्के रक्कम कर्मचारी राज्य विमा निगमकडे जमा केल्यावर निगमद्वारे एक कार्ड संबंधित कामगार-कर्मचाऱ्यास दिले जाते. त्याआधारे त्याला वा त्याच्या कुटुंबियांना जिल्ह्यात निर्धारित २५ प्रकारचे मोफत वैद्यकीय उपचार मिळणार आहेत.ई.एस. आय.सी.संदर्भातील प्रश्नांची सोडवणूक नगर येथून होण्यासाठी कामगार व रोजगार मंत्रालयाकडे पाठपुरावा सुरू होता. मराठा चेंबर ऑफ कॉर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष अरविंद पारगावकर व उपाध्यक्ष प्रकाश गांधी तसेच एच. आर. फोरमचे अध्यक्ष राजेश पेवाल यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. राज्य कर्मचारी विमा निगमच्या लाभ घेण्यासाठी येणाऱ्या अडचणींवर चर्चा करण्यासाठी मराठा चेंबर ऑफ कॉर्सच्या पुढाकाराने विशेष बैठकीचे आयोजन केले जात होते. परंतु, त्यासाठी उद्योजक व कर्मचाऱ्यांना नाशिक येथे जावे लागत असे. त्यामुळे योजनेचा लाभ घेण्यात वेळ जात होता. यावर एच.आर विभागाच्या बैठकीमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली होती. त्यानंतर एच.आर. फोरमचे अध्यक्ष यांच्या झालेल्या बैठकीत केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालयाशी पत्रव्यवहार करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार नगर जिल्ह्यातील ई. एस. आय. सी.विषयक समस्या केंद्रीय कामगार मंत्रालयाबरोबर झालेल्या पत्रव्यवहारांतून मांडण्यात आल्या. नगर जिल्ह्यातील कामगारांसाठी अधिक रुग्णालयांचा समावेश योजनेंतर्गत करावा आणि ई. एस. आय. सी. कार्यालयाची उपशाखा नगरला स्थापन करावी, अशी मागणी पत्राद्वारे आली. या तातडीने दखल घेऊन केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालय मंत्रालयाने मुंबई येथील ई. एस. आय. सी. विभागाच्या राज्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना विशेष लक्ष देण्यास सांगितले. या पाठपुराव्यास यश मिळाले व त्यांच्याकडून नगर जिल्ह्यामध्ये आता ई. एस. आय. सी. कार्यालय आणि डिस्पेन्सरी स्थापन करण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. उद्योजक व ई. एस. आय. विषयक प्रश्नांची सोडवणूक आता नगर येथून होणार आहे. तसेच ई. एस. आय. सी.ची वैद्यकीय सुविधा कर्मचाऱ्यांना आता जिल्ह्यातील २५ रुग्णालयांध्ये मिळू शकणार आहे. या योजनेंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांत मोफत उपचार केले जातात. गंभीर आजार असल्यास खासगी रुग्णालयात पाठवले जाते. खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर उपचारांचा खर्च निगमद्वारे केला जातो. या अधिक माहितीसाठी एमआयडीसीच्या नगर कार्यालयाशेजारील मराठा चेंबर ऑफ कॉर्सच्या नगर शाखेत प्रदीप बागुल यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डॉक्टर्स नेहमीच सेवाव्रत अंगीकारुन सातत्याने कोविड महामारीत सेवा देत आहेत

जगभरात कोरोनाचं संकट कमी होण्याचं कोणतंच चिन्ह दिसत नाही.भारतात आता कोरोनाने कहर करण्यास सुरुवात केलीये. अश्या परिस्थितीत दररोज वाढणाऱ्या कोरोना रुग्णांचा आकडा पाहायला मिळत असताना रुग्णसेवेचं अखंड व्रत घेवून अहोरात्र सेवा देणाऱ्या कोरोना योद्ध्यांच्या रूपातील सर्व समर्पित डॉक्टरांना मानचा मुजरा करत त्यांचे सन्मानपत्र देवुन रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्यावतीनं त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी बोलताना रोटरीचे अध्यक्ष प्रसन्न खाजगीवाले म्हणाले की, डॉक्टर्सच्या सध्याच्या दिनचर्या प्रमाणे आपला असा एक दिवस असू नये कारण डॉक्टर्स नेहमीच देवासमान आहेत व सेवाव्रत अंगीकारुन सातत्याने कोविड महामारीच्या वेळेस सेवा देत आहेत. कोविडसारख्या कठीण प्रसंगात डॉक्टर्स, नर्स, सफाई कर्मचारी, पोलीस, मिडीया प्रतिनिधी यांनी जे कर्तव्य बजावलय ते अतुलनीय आहे. त्यांच्या ह्या महान कार्यास मानाचा मुजरा देत सन्मानपत्र देवुन त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करताना आम्हाला अभिमान वाटतो असे ते म्हणाले. ह्यावेळी सिव्हील सर्जन डॉ. प्रदिप मुंबरीकर, डॉ. सुनिल पोखर्णा, डॉ. बापुसाहेब गाढे व सिव्हील हॉस्पिटल येथील सर्व डॉक्टर्सचे सन्मानपत्र देवुन डॉक्टर्स डे निमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. डॉक्टर्स डे, डॉक्टरांसाठी साजरा करण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी म्हणून वेगवेगळ्या विषयांवर समाज प्रबोधन करण्याचे मानस असल्याबाबत अभय राजे म्हणाले. यावेळी गव्हर्नर अभय राजे, सिसटंट गव्हर्नर मनिष बोरा, रो. राजीव गुजर,रो. राजेश परदेशी पब्लिक ईज संचालक रो. चेतन अमरापुरकर, तसेच रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रसन्न खाजगीवाले व सेक्रटरी ईशर बोरा उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. प्रदिप मुंबरीकर यांनी रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांनी डॉक्टरांच्या कार्याचा गौरव सन्मानपत्र देवुन केल्याबद्दल रोटरीचे विशेष आभार मानले. कोरोनाबाधितांवर उपचार करून त्यांना रुग्णसेवा देताना एका बाजुला कर्तव्याचा पालन करण्याचा आनंद असतो तर दुसरीकडे धोका, परंतु जेव्हा अशा रितीने समाजाभिमुख सेवाभावी संस्थाकडुन कौतुकास्पद थाप मिळते तेव्हा केलेल्या परिश्रमाचा परिहार होतो व नव्या जोने पुन्हा कर्तव्य बजावण्याची उमेद जागते, असेही ते म्हणाले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरीचे पब्लिक इमेजचे रो. चेतन अमरापुरकर तसेच सर्व कार्यकारीणी सदस्य आणि पूर्ण रोटरी सेंट्रल यांचे सहकार्य लाभले. शेवटी रो. ईशर बोरा यांनी आभार मानले.



# सरकारने शिफारस केलेल सदस्य विधानपरिषदेत जाऊ नयेत असे विरोधी पक्षाला वाटत आहे : राऊत

मुंबई, – शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकार आणि राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यावर सडकून टीका केली आहे. राज्यपाल नियुक्त विधान परिषदेच्या १२ जागांच्या नियुक्तीला होणाऱ्या दिरंगाईवरून राऊत यांनी पुन्हा राज्यपालांना लक्ष्य केले. तसेच ही परिस्थिती राजकारणातील नवी आणीबाणी असल्याचा आरोप केला. संजय राऊत म्हणाले, विधान परिषदेत राज्यपाल नियुक्त १२ जागा भरायच्या आहेत. या १२ जागांचे राजकारण आताच सुरू झाले आहे. सरकारने शिफारस केलेले १२ सदस्य विधान परिषदेत जाऊ नयेत असे विरोधी पक्षाला वाटत आहे.महाराष्ट्रातील तीन प्रमुख राजकीय पक्ष एकत्र आले व त्यांनी १०५ आमदारांचा सगळ्यात मोठा पक्ष असलेल्या भाजपला दूर ठेवून सरकार बनवले. शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस अशा तीन पक्षांत या १२ राज्यपाल नियुक्त सदस्यांची वाटणी होईल. हे १२ सदस्य कोण व त्यांची नेमणूक राज्यपाल करतील काय? हाच प्रश्न आहे.गृहखात्याचे काम कायदा-सुव्यवस्था, राष्ट्राची, राज्याची सुरक्षा राखणे हे प्रामुख्याने असते, पण गृहखात्याकडे पोलीस, गुप्तचर, राजभवनाचा ताबा असतो. राजकारणासाठी त्यांचा सर्रास वापर ५० वर्षांपासून सुरूच आहे. त्यामुळे पहाटे पहाटे सरकारचा शपथविधी करून घेणारे राज्यातील नामनियुक्त १२ जागांचे राजकारण नक्कीच करतील व सर्व प्रकरण शेवटी राज्यपालांवर ढकलून नामा निराळे राहतील. राज्यपाल स्वतःच्या मर्जीने हे सदस्य निवडू शकत नाहीत. ही यादी मंत्रिमंडळाकडून ठरवली जाते. ती यादी राज्यपालांना बंधनकारक असते असे आपले संविधान सांगते, पण राज्यपाल या यादीवर निर्णय घेण्यास जास्तीत जास्त विलंब करतील.




हम अभी तक हैं गिरफ़्तार-ए-मुहब्बत यारों,
ठोकरें खा के सुना था कि सम्भल जाते है ।
बशीर बद्र

# रत्नदीप मेडिकल फाउंडेशनने सामाजिक कार्यातून आपल्या कामाचा ठसा उमटवला : आ.रोहित पवार

अहमदनगर (जामखेड) – शहरातील रत्नदीप मेडिकल फाउंडेशनने वेळोवेळी सामाजिक कार्यातून आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. त्यामुळे संस्थेचे अध्यक्ष डॉ. भास्कर मोरे व सचिव डॉ. वर्षा मोरे यांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन आमदार रोहित पवार यांनी केले.जामखेड येथील रत्नदीप मेडिकल फाउंडेशनच्या होमिओपॅथिक क्लिनिकचे उद्घाटन आमदार पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, रत्नदीप मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. भास्करराव मोरे, सचिव वर्षा मोरे, पोलीस उपअधीक्षक संजय सातव, तहसीलदार विशाल नाईकवाडे, पोलीस निरीक्षक प्रभाकर पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुनील बोराडे वैद्यकीय अधिकारी डॉ. युवराज खराडे, राष्ट्रवादीचे नेते मधुकर राळेभात, समीर पठाण आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. करोना विषाणूने आता ग्रामीण भागात देखील पाय रोवायला सुरवात केली आहे. याच अनुषंगाने करोनाचा संसर्ग टाळून रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी जामखेड येथील रत्नदीप मेडिकल फाउंडेशनतर्फे शहरातील नागरिकांना नाममात्र दारात आर्सेनिक अल्बम-३० गोळ्यांचे वितरण होणार आहे. या आधीही रत्नदीपने बीएचएमएस, फार्मसी, नर्सिंगच्या प्रथम वर्षाच्या संस्थात्मक कोट्यातील प्रवेशासाठी फीमध्ये ५० टक्के सवलत दिली आहे. तसेच रमजानच्या काळातही नागरिकांना तबब्बल दहा टन कलिंगड मोफत वाटप केले. संस्थेच्या होमिओपॅथिक, फार्मसी व नर्सिंग महाविद्यालयाच्या मार्फत रत्नदीप शैक्षणिक संकुलात करोना विलगीकरण कक्ष सुरू करण्यात

# उपोषणानंतर रस्त्याच्या साईड पट्ट्या भरण्यास सुरुवात

अकोले, – अकोले ते देवठाणमार्गे सिन्नर या १२ किमी रस्त्याच्या साईडपट्ट्या दुरुस्ती संदर्भात देवठाण येथील ग्रामस्थांनी उपोषण सुरू केले होते. त्यानंतर या कामात तत्काळ सुरूवात करण्यात आली आहे.तालुक्याच्या गावी न येता देवठाण येथे हे उपोषण पंचायत समितीचे माजी सदस्य अरुण शेळके, सामाजिक कार्यकर्ते संदीप दराडे, गणेश आवारी, फोडसे, एकनाथराव सहाणे, केशव बोडके,श्रीकांत सहाणे, शरद घाडगे, सुभाष सहाणे, भारत सहाणे, मुरली पथवे,दीपक सहाणे, अब्दुल इनामदार व देवठाण भजनी मंडळाने उपोषण सुरू केले होते. या आंदोलनास आमदार डॉ. किरण लहामटे, माजी आमदार वैभवराव पिचड, जि. प. सदस्य जालिंदर वाकचौरे, शिवसेना तालुकाप्रमुख मच्छिंद्र धुमाळ, तहसीलदार मुकेश कांबळे, शंभू नेहे, डॉ. रवी गोर्डे, प्रमोद मंडलिक, संतोष आंबरे, बाळासाहेब शिंदे, बाबासाहेब उगले, ज्ञानेशर उगले,अमोल उगले यांनी भेट दिली होती. पिचड यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता ज्ञानेशर काकडे यांच्याशी चर्चा केली होती.त्यानंतर उपोषणकर्त्यांच्या अटीनुसार कामास सुरुवात करून साईपट्या १५ जुलैपर्यंत मुरमाने भरून रोलिंग करण्याचे पत्र देण्यात आले.









# मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निलंबनाची छावा संघटनेची मागणी

अहमदनगर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनमध्ये सर्वसामान्य जनता त्रस्त असताना जबाबदार अधिकारी यांनी मस्तवालपणे आपल्या कर्तव्याचे पालन न करता शहराला काळीमा फासणारे कृत्य केल्याचा निषेध अ.भा.छावा संघटनेच्या वतीने करण्यात आला. तर मनपा आरोग्य अधिकारी, अग्निशमन विभाग प्रमुख व कर्मचारीला तातडीने निलंबीत करण्याची मागणी मनपा उपायुक्त डॉ.प्रदीप पठारे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी छावाच्या महिला जिल्हाध्यक्षा सुरेखा सांगळे, आशा गायकवाड, सुमेता शेजुळ, सुरेखा साळी,विलास कराळे आदि उपस्थित होते. बोल्हेगाव येथील १४ वर्षीय शाळकरी मुलाच्या घरात घुसून मद्य प्राशन करुन महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे, अग्निशमन विभाग प्रमुख शंकर मिसाळ, कर्मचारी बाळू घाटविसावे यांनी मारहाण करुन गच्ची वरुन फेकून देण्याचा प्रयत्न केला. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना १३ जून रोजी घडली. याबाबत पिडीत मुलाच्या फिर्यादीवरुन तिघांविरुध्द तोफखाना पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झालेला आहे. सदर अधिकारी हे आरोपी असून, त्यांना जबाबदारीच्या पदावरुन तातडीने निलंबीत करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# रक्तदान शिबिराने शिर्डीत गुरूपौर्णिमा साजरी



अहमदनगर (शिर्डी) – शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान विशस्तव्यवस्थेतर्फे श्री गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त श्री साई आश्रम येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले.या शिबिरात स्वतः संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी डोंगरे यांनी रक्तदान करुन आपला सहभाग नोंदवीला. याप्रसंगी संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र ठाकरे, मुख्य लेखाधिकारी बाबासाहेब घोरपडे,प्रशासकीय अधिकारी डॉ. आकाश किसवे, दिलीप उगले, उपअभियंता रघुनाथ आहेर आदी उपस्थित होते.तसेच या शिबिरात संस्थानचे मुख्य लेखाधिकारी घोरपडे, जनसंपर्क अधिकारी मोहन यादव यांच्यासह शिर्डीतील नागरिक व संस्थानच्या विविध विभागांतील कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना संस्थानच्या वतीने प्रमाणपत्र व ब्लड डोनर कार्ड देण्यात आले. सदर शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. विजय नरोडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मैथिली पितांबरे व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. आज पहाटे साडेचार वाजता काकड आरती झाली.पहाटे पाच वाजता श्री साईसच्चरित या ग्रंथाच्या अखंड पारायणाची समाप्ती झाली.या निमित्ताने श्री साईबाबांच्या प्रतिमेची व पोथीची व्दारकामाई मंदिरातून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीतपुजारी उदय वाळुंजकर यांनी वीणा, दिलीप सुलाखे यांनी पोथी, तरविलास जोशी व चंद्रकांत गोरकरयांनी श्रींची प्रतिमा घेवून सहभागघेतला. यावेळी मंदिर प्रमुख रमेश चौधरी उपस्थित होते.

साप्ताहिक दर्शक
e-mail - weeklydarshak@gmail.com

IF UNDELIVERED PLEASE RETURN TO
DARSHAK
DARSHAK BHAVAN,
726,OPP.DEPALI THEATER ZENDIGATE,
AHMEDNAGAR-414001
MAHARASHTRA

R.N.I. NO.
MAH/MAR/2000/02266
POSTAL REGD.NO.
ANR/068/2018-2020

TO,